Volume: 1 Issue: 12 Pages: 15-17

International Journal of Research in Academic World

E-ISSN: 2583-1615
Impact Factor: 4.714

Received: 25/July/2022 Int. J Res. Acad. World. 2022; 1(12):15-17 Accepted: 28/August/2022

# उच्च प्राथमिक स्तरावर मराठी विषयाच्या अध्यापनात नाटयीकरण पद्धतीच्या परिणामकारकतेचा अभ्यास

*[1]प्रा.डॉ.पी.बी.वाघेरे और [2]प्रा.डॉ. कैलास खोंडे

*[1, 2]एसोसिएट प्रोफेसर, मविप्र समाजाचे, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक, महाराष्ट्र, भारत।

**सारांश**

नाट्यीकरण हे अध्यापनाचे अतिशय प्रभावी असे साधन आहे. नाट्यीकरण माध्यमातून अध्यापन केल्याने मराठी विषयातील कठीण संकल्पनाही विद्यार्थ्यांच्या चिरकाल स्मरणात राहतात यात शंका नाही, शिवाय नाट्यीकरण माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रसंगातील विविध पात्रानुसार अभिनय करावा लागत असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पात्रातील किंवा एखाद्या प्रसंगातील गुणवैशिष्ट्येसुद्धा अविष्कृत होण्यास मदत होते, शिवाय विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापन प्रक्रियेत रंजकता वाटू लागते म्हणून नाट्यकरण पद्धती ही मराठी विषयांमध्ये प्रभावी ठरत असल्याचे प्रस्तुत संशोधनांती लक्षात येते.

ग्रामीण आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना अभिनय करणे, अभिनयाचे निरीक्षण करणे अशा गोष्टी विशेष भावतात त्याच विचारांचा आधार घेऊन मराठी अध्यापनासाठी नाट्यीकरण पद्धती वापरली तर ती विद्यार्थ्यांना अध्ययनामध्ये अभिरुची वाढविण्यासाठी उपयुक्त ठरते असा यापूर्वी केलेल्या संशोधनांचा सुद्धा आधार आहे मात्र हीच पद्धती आदिवासी भागातही उपयुक्त ठरते का तेही पाहणे रंजक होते म्हणून आदिवासी दुर्गम भागातील विद्यार्थी नाट्यीकरण माध्यमातून ज्या बाबी प्रमाण भाषेतून ते शिकू शकत नाही त्याबाबी नाट्यीकरणाच्या माध्यमातून विद्यार्थी सोयीस्करपणे शिकतात हे या संशोधनातून सिद्ध होते, असे निष्कर्ष या शोधनिबंधात मांडलेले आहेत.प्राथमिक मराठी शाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या अध्यापनात नाटयीकरण पद्धतीचा वापर केल्याने होणाऱ्या परिणामकारकतेचा अभ्यास करण्यासाठी प्रायोगिक पद्धतीचा अवलंब केलेला आहे. व न्यादर्श म्हणून प्राथमिक मराठी केंद्रशाळा, खानवेल येथील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना संभाव्यतेवर आधारित लॉटरी पद्धतीने निवडले.प्रस्तुत शोधनिबंधात विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण करून अर्थनिर्वचन करण्यात आले व त्या अनुषंगाने उद्दीष्टनिहाय निष्कर्ष मांडलेले आहेत. त्याचबरोबर काही सूचना व शिफारशी केलेल्या आहेत. तसेच या संशोधांनाला अनुसरून पुढील संशोधनासाठी काही नवीन विषयही सूचविलेले आहेत

**Keywords:** उच्च प्राथमिक स्तर, मराठी विषय, अध्यापन, नाटयीकरण पद्धती, परिणामकारकता, अभ्यास

## प्रस्तावना

सद्यपरिस्थितीत सारे जग ज्ञानसागरात पोहचण्यास सज्ज झालेले आहे. ही परिस्थिति ज्ञानाच्या प्रस्फोटामुळे निर्माण झालेली आहे. शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल झालेले दिसून येतात.मराठी हा विषय सर्व माध्यमांच्या विद्यार्थ्यांसाठी सक्तीचा आहे. या विषयात अभिरूची नसण्याची कारणे देखील भरपूर प्रमाणात आहे. विद्यार्थ्यांच्या मनावर विषयाबद्दलचा असलेला पूर्वग्रह, त्याचबरोबर पाठात शैक्षणिक साधनांची निवड केली नाही तर विद्यार्थ्यांचे पाठाकडे लक्ष लागत नाही. पाठानुसार योग्य त्या अध्यापन पद्धतीची निवड न करणे महत्त्वाचे आहे. उच्च प्राथमिक स्तरातील मराठी अध्ययनात नाट्यीकरण पद्धतीचा वापर व परिणामकारकतेचा अभ्यास संशोधनाद्वारे केला आहे.

## संशोधनाची गरज

प्रस्तुत संशोधन हे अध्यापन अध्ययन प्रक्रियेत नवीन पर्यायाची परिणामकारकता अभ्यासण्याच्या दृष्टीने गरजेचे आहे. मराठी विषय शालेय स्तर ते महाविद्यालयीन स्तरापर्यंत शिकवला जातो. इतर विषय व मराठी यात महत्त्वाचा फरक आहे. विज्ञान, गणित, भूगोल या विषयांचा पायाच मूळी प्रयोग दाखविल्यानंतर त्यातील तथ्ये, तत्त्वे चटकन मुलांच्या लक्षात येतात. मात्र मराठी विषयाचे तसे नाही. विद्यार्थ्यांना अध्ययनादरम्यान कोणकोणत्या अडचणी येतात ? कोणत्या अध्यापन पद्धतीने अध्यापन केले तर त्याचा सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांवर होईल ? या प्रश्नाच्या उत्तरांचा शोध घेण्यासाठी सदर संशोधनाची गरज वाटली.

## संशोधनाचे महत्त्व

विद्यार्थ्यांना अडचणी येतात. आशय समजणे सोपे होते. वाचनातील व लिखाणातील अडचणी कमी होतील तसेच बोलण्यात येणाऱ्या अडचणी कमी होण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांना मराठी विषयाबद्दलची अभिरुचि निर्माण होईल. त्याचप्रमाणे अध्यापन रटाळपणे होऊ नये त्यात सतत बदल करत राहणे त्यादृष्टीने प्रयत्नांसाठीच सदरचे संशोधन महत्वपूर्ण आहे.

1. विद्यार्थ्यात आत्मविश्वास वाढेल.
2. विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास साध्य करता येईल.
3. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता व कल्पनाशक्ति वाढीस लागते.
4. विद्यार्थ्यांची स्वयं अध्ययन क्षमता वाढेल.

## संशोधनाची समस्या

उच्च प्राथमिक स्तरावर मराठी विषयाच्या अध्यापनात नाटयीकरण पद्धतीच्या परिणामकारकतेचा अभ्यास.



*Corresponding Author: प्रा.डॉ.पी.बी.वाघेरे

### 1. समस्या विधान

प्राथमिक मराठी केंद्रशाळा, खानवेल येथील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या अध्यापनात नाटयीकरण पद्धतीच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

### 2. समस्येचे स्पष्टीकरण

इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयाचे अध्यापन जर पारंपरिक पद्धतीने केले तर त्यांचे अध्ययन फारसे परिणामकारकपणे होत नाही. अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. म्हणून जर मराठी विषय अध्यापनात पारंपरिक पद्धतीऐवजी नाटयीकरण पद्धतीने केले तर अध्ययन सोपे होण्यास मदत होईल. म्हणून विषयाच्या अध्यापनात नाटयीकरण पद्धतीच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे,ही समस्या घेतली आहे.

### समस्या विधानातील पारिभाषिक संज्ञाच्या व्याख्या

**अ) संकल्पनात्मक व्याख्या**

1. **उच्च प्राथमिक स्तर:** प्राथमिक व माध्यमिक यांना जोडणारा दुवा म्हणजे उच्च प्राथमिक स्तर होय.
2. **मराठी विषय:** महाराष्ट्र शिक्षण विभागाने अभ्यासक्रमात समाविष्ट केलेली महाराष्ट्र राज्यातील मराठी माध्यमांच्या शाळांमधून शिकवली जाणारी प्रथम भाषा.
3. **अध्यापन:** विद्यार्थ्यांना अध्ययनास प्रवृत्त करण्यासाठी शिक्षकाची वर्गातील कृती.

**ब) कार्यात्मक व्याख्या**

1. **इयत्ता आठवी:** प्राथमिक मराठी केंद्रशाळा, खानवेल या शाळेतील इयत्ता आठवीचा वर्ग
2. **विद्यार्थी:** प्राथमिक मराठी केंद्रशाळा, खानवेल या शाळेतील इयता आठवी अच्या वर्गात अध्ययन करणारे अध्ययनार्थी
3. **नाटयीकरण पद्धत:** अभिनयाच्या माध्यमातून पाठ्यांश शिकवणे.

### संशोधन प्रश्न

1. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना मराठी हा विषय पारंपारिक पद्धतीने शिकवल्यास का समजत नाही ?
2. नाट्यीकरण पद्धतीने शिकविले तर विद्यार्थ्यांना मराठी विषय समजेल.
3. मराठी विषयाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण होईल का ?

### संशोधनाची उद्दिष्टे

1. पारंपारिक पद्धतीने अध्यापनाची परिणामकारकता तपासणे.
2. नाट्यीकरण पद्धतीने अध्यापनाची परिणामकारकता तपासणे.
3. पारंपारिक अध्यापन व नाट्यीकरण अध्यापन दोन्हीची तुलना करून परिणामकारकता अभ्यासणे.

### संशोधनाची गृहितके

1. विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या अध्यापनात अडचणी येतात.
2. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या अध्ययनात कमी रस दिसून येतो.
3. पारंपारिक पद्धतीने मराठी विषयाचे अध्ययन कंटाळवाणे होते.

### संशोधनाची परिकल्पना

जर विद्यार्थ्यांना मराठी विषयाचे नाट्यीकरण पद्धतीने अध्यापन केले तर अध्यापन परिणामकारक होईल.

### शून्य परिकल्पना

इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना नाटयीकरण पद्धतीद्वारा मराठी विषयाचे अध्यापन केले तरी अध्यापन परिणामकारक होणार नाही.

### संशोधन परिकल्पना

इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना नाटयीकरण पद्धतीद्वारा मराठी विषयाचे अध्यापन केले तरी अध्यापन परिणामकारक होईल.

### संशोधनाची व्याप्ती

1. प्रस्तुत संशोधन हे मराठी माध्यमाच्या उच्च प्राथमिक स्तराशी निगडीत आहे.
2. प्रस्तुत संशोधन हे केवळ प्राथमिक मराठी शाळांशी संबंधित आहे.
3. सदर संशोधन हे इयत्ता आठवीच्या फक्त मराठी विषयाशी संबंधित आहे.
4. सदर संशोधन हे नाटयीकरण पद्धतीचा अध्ययनात वापर केल्याने होणाऱ्या परिणामांशी संबंधित आहे.

### संशोधनाची मर्यादा

1. सदर संशोधन हे इयत्ता आठवीच्या मराठी विषयातील संगणकाचा महिमा याघटकापुरतेच मर्यादित आहे.
2. प्रस्तुत संशोधन हे केवळ प्राथमिक मराठी शाळा खानवेलशी संबंधित आहे.
3. सदर संशोधन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात इयत्ता आठवीत शिकणाऱ्या आहे.
4. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष इतर विद्यार्थ्यांना लागू होतीलच असे नाही.

### संबंधित साहित्य व संशोधन आढावा

कोणत्याही विषयाशी संबंधित संशोधन हाती घेतल्यावर त्याबाबतीत पूर्वी झालेल्या अभ्यासाचा आढावा घेणे गरजेचे असते. यात संशोधन साहित्याचा तसेच एम.एड., एम. फिल., पी.एच.डी. स्तरावरील संशोधनांचा अभ्यास केलेला आहे.

### संशोधनाची कार्यपद्धती

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वाधिक प्रायोगिक पद्धतीचा वापर केलेला आहे. त्यातील एकलगट अभिकल्पाचा वापर केलेला आहे.

### जनसंख्या व नमूना निवड

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक मराठी केंद्रशाळा, खानवेल येथील इयत्ता आठवीचे सर्व विद्यार्थी ही जनसंख्या आहे. तर त्यापैकी आठवी अ च्या वर्गातील ४० विद्यार्थी संख्या लॉटरी पद्धतीने निवडलेली आहे.

### संशोधन साधने

प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलित करण्यासाठी स्व-निर्मित चाचणीचा उपयोग केलेला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी प्रत्येकी २० गुणांची पूर्व चाचणी व उत्तर चाचणी घेण्यात आली.

### संकलित माहितीचे कोष्टकीकरण व अर्थनिर्वचन

या प्रकरणात ४० विद्यार्थ्यांच्या पूर्व चाचणीचे २० पैकीच्या गुणांचे मध्यमान हे उतर चाचणीच्या २० पैकी गुणांचे मध्यमान काढण्यात आले. त्यावरून प्रमाण विचलन काढण्यात आले. निरीक्षणावरून अर्थनिर्वचन काढले. परिकल्पना पडताळणी करण्यात आली.

### संशोधनातील निष्कर्ष

1. विद्यार्थ्यांना मराठी विषयाचे पारंपरिक पद्धतीने अध्यापन केल्यानंतर पूर्व चाचणीद्वारे पडताळणी केली असता इयत्ता आठवीच्या ४०% विद्यार्थ्यांना पैकी गुण मिळाले आहेत.
2. विद्यार्थ्यांना पूर्व चाचणीतील मध्यमान हे ११.५ इतके आले असून उत्तर चाचणीतील मध्यमान १४.४५ म्हणजेच ४.९५ फरकाने जास्त आले.
3. पूर्व चाचणीतील प्रमाण विचलन हे १.८७ इतके आले असून उत्तर चाचणीतील प्रमाण विचलन हे २.४८ म्हणजेच ०.६१ फरकाने जास्त आले.
4. मराठी विषयाच्या अध्यापनासाठी नाट्यीकरण पद्धतीने अध्यापन केल्यास ते पारंपारिक पद्धतीने अध्यापन करण्यापेक्षा अधिक परिणामकारक आहे. हे पूर्व चाचणीच्या तुलनेत पूर्वोत्तर चाचणीत अधिक असल्याचे आढळून आले. म्हणजेच नाटयीकरण पद्धतीने विद्यार्थ्यांना अध्यापन केल्यास त्याचा सकारात्मक परिणाम झाला.
5. पूर्वोत्तर चाचणीतील गुणांकाचे मध्यमान १५ व उत्तर चाचणीतील गुणाकाचे मध्यमान १४.४५ यातील फरकावरून ४.९५ असे म्हणता येते की प्रायोगिक उपचारामुळे म्हणजेच नाटयीकरण पद्धतीमुळे त्या विद्याथ्र्यांच्या संपादणूकीत लक्षणीय वाढ झालेली दिसते.
6. पूर्वोत्तर चाचणीमध्ये पूर्व चाचणीपेक्षा मध्यमानापासून विचलित होण्याची गुणांकाची प्रवृत्ती कमी झालेली दिसते.
7. वरील निष्कर्षावरून असे लक्षात की, प्राप्त मूल्य हे नमुना 1 मूल्यापेक्षा ०.०१ व ०.०५ या दोन्ही स्तरांवर अधिक असल्यामुळे शून्य परिकल्पनेचा त्याग केल्याचे दिसून येते व संशोधिकेने मराठी विषयाच्या अध्यापनासाठी नाटयीकरण पद्धतीने अध्यापन केल्यास उपयुक्त व परिणाम स्वीकार्य आहेत व उपचार मात्र ही सकारात्मक दिसून येते.

### सूचना व शिफारशी

#### विद्यालयातील मुख्याध्यापकांसाठी

1. मुख्याध्यापकांनी मराठी विषयाशी निगडीत उपक्रम विद्यालयात यशस्वीपणे व मराठी विषयासाठी आवश्यक त्या सर्व प्रकारचे सहाय्य व मार्गदर्शन मुख्याध्यापकांनी उपलब्ध करून द्यावे.
2. मुख्याध्यापकांनी मराठी विषय शिक्षकांना मराठीतील व अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे.
3. मुख्याध्यापकांनी विषय शिक्षकांसाठी विद्यालयात विविध अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर कार्यक्रमाचे आयोजन करावे.

#### मराठी विषय शिक्षकांसाठी

1. शिक्षकांनी मराठी विषयाच्या वाढीसाठी सतत प्रयत्न करणे.
2. मराठी विषय शिक्षकांना विविध नाविन्यपूर्ण गोष्टीचा नंदिन अध्यापनात उपयोग करावा
3. शिक्षकांनी विविध मार्ग सखोल ज्ञान मिळविण्यासाठी प्रयत्न करणे.
4. विविध नवनवीन तंत्रज्ञान अध्यापनासाठी चांगला व नेटका उपयोग करावा.
5. शिक्षकांनी मराठी विषयाच्या संदर्भातील विविध शिबीर, परिषद, चर्चासत्रे यांना हजर रहावे.

### पुढील संशोधनाचे विषय

1. माध्यमिक स्तरावरील विद्याथ्र्यांना मराठी विषयाच्या अध्यापनासाठी भूमिकाभिनय पद्धतीने अध्यापन करून परिणामकारकतेचा अभ्यास,
2. बी.एड. विद्यार्थी शिक्षकांना प्रतिमानांचे महत्त्व पटवून देवून त्या आधारे अध्यापन केल्यास विद्यार्थ्यांच्या विषय संपादणूकीत होणाऱ्या वाढीचा अभ्यास.
3. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयाच्या व्याकरणातील होणाऱ्या चूकांचा शोध व परिणामकारकतेचा अभ्यास-
4. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्याथ्र्यांच्या हिंदी विषयाच्या प्रभावी वाचनासाठी उपक्रमांचे विकसन व परिणामकारकतेचा अभ्यास.

### संदर्भ सूची


1. भिंताडे, वि.रा. (२००५), शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे नूतन प्रकाशन
2. भदाणे, मुरलीधर. (नोव्हेंबर २०१५) शैक्षणिक संशोधन मांडणी व दिशा नाशिक: सात्विक प्रकाशन. प्रथमावृत्ती.
3. बापट, भा.गो. (१९७५), शैक्षणिक संशोधन, पुणे नूतन प्रकाशन. द्वितीय आवृत
4. हेर्लेकर, दि. (२०१०), इतिहास विषय, मुंबई इतिहास परिषद
5. पंडीत, ब.बी. (ऑक्टोबर २००८), शैक्षणिक कृती संशोधन, पुणे नित्यनूतन प्रकाशन.
6. सामंत. क.का. (१९८८). संशोधन पद्धती प्रक्रिया व अंतरंग पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती.